2256/2023

THIS DOCUMENT CONTAINS 4 PAGES

APPENDIX - XV

# CERTIFICATE OF RECOGNITION

Zilla Parishad Ahmadnagar Education Department (Primary)
Telephone no – 0241-2353694
E-mail ID – prathmik55@gmail.com
Address – New Government Building Ahmednagar Pin Code – 414001

No. **Outward No: Pri. Education/office - 4/R.T.E. Self Financed / 351/2022**

Date: 14/09/2022

To

**Podar International School, Sangamner**

Pansare Farms, Sukewadi Road, Sangamner - 422605

Sir/ Madam,

**Sub: Recognition Certificate for the school under Rule 11, Sub-rule (4) of the Right of Children to Free and Compulsory Education Rules, 2011.**

Ref: -

With reference to your application dated **06/7/2022** and subsequent school inspection in this regard, I hereby convey the grant of Recognition to **Podar International School, Sangamner Pansare Farms, Sukewadi Road, Sangamner** for **class I to VIII** standard for the period **Three** from the academic year 01/04/2022 to 31/03/2025 in compliance to section 18 of Right of Children to Free and Compulsory Education, Act, 2009 & rule**11 of Sub Rule (4)**

The above recognition is subject to the following conditions:-

1. The temporary recognition accorded to the school is valid from the academic year 2022-23 to 20 24-25 and is to be renewed at an interval of every **Three** years.

2. The grant of recognition is available initially for classes I to VIII standard and to be extended for Secondary /Senior Secondary classes subsequently in due course of time.

3. The school shall abide by the provisions of the Right of Children to Free and Compulsory Education Act, 2009 and the **Maharashtra Right of Children to Free and Compulsory Education Rules, 2011 (Schedule Two).**

4. The school shall admit in pre-school / class I to the extent of **25 %** of the strength

NOTARY ★ J. G. WALUNJ Area Ahmednagar District Reg. No. 6436 Dt.Ex. 30/7/2023 GOVERNMENT OF INDIA

NOTARIAL NOTARIAL NOTARIAL

General Manager
Nashik Region
Podar Charity Trust

Principal
Podar International School
Sangamner

in each class, children belonging to Weaker Section and Disadvantaged Group in the neighborhood and provide free and compulsory elementary education till its completion.

5. The school shall maintain a separate bank account for the purpose of reimbursement. APPENDIX - XV

6. The school shall not collect any capitation fee and subject the child or his or her parent or guardian to any screening procedure.

7. The school shall not deny admission to any child, -

a. For lack of age proof if such admission is sought subsequent to the extended period prescribed for admission.

b. On the ground of religion, caste or race, place of birth or any of them.

8. The school shall ensure that,-

a. No child admitted shall be held back in any class or expelled from school till the completion of elementary education in a school.

b. No child shall be subjected to physical punishment or mental harassment.

c. No child is required to pass any board examination till the completion of elementary education.

d. Inclusion of students with disabilities/ special need as per provision of the rule/ clause of State Act

e. The teachers are recruited with minimum qualifications as laid under **under section 23 (1)**

f. The teachers perform his duties specified under **section 24 (1)**.

9. The school shall follow the syllabus on the basis of curriculum laid down by appropriate authority.

10. The school shall maintain the standards and norms as specified in **section 19**

11. No unrecognized classes shall run within the premises of the school or outside in the Name of school.

12. The school building plan must have been approved by the current rules or G. Os. The school building or other structures and the grounds are used only for the purposes of education and skill development. Construction work within the compound should not be carried out in school working hours and safety measures in all respect are under whole responsibility of the managements.

13. The school is run by a society registered under the Societies Registration Act, 1860 (21 of 1860) or the Bombay Public Trustees Act, 1950, or a public trust constituted under any law for the time being in force.

General Manager
Nashik Region
Podar Charity Trust

Principal
Podar International School
Sangamner

14. The school is not run for profit to any individual, group or association of individuals or any other persons.

15. The accounts should be audited and certified by a Chartered Accountant and proper accounts statements should be prepared.

16. The school shall furnish such reports and information as may be required by the competent authority from time to time and shall comply with such instructions of the State Government or the competent authority as may be issued to secure the continued fulfillment of the condition of recognition or the removal of deficiencies in working of the school.

17. **Three** languages shall be taught as a subject from in standards I to X in all schools notified under concerned Act/ rule from academic session recognition is granted. APPENDIX - XV

18. The school shall abided by the provisions of the State Act/ Rules.

19. The certificates of recognition issued by the department shall be subject to the fulfillment of deficiencies if any pointed out by the department at any stage/ time.

20. The management shall rectify the deficiencies pointed out in infrastructure or administration by the authorities.

21. The management shall apply for renewal of recognition three months before the expiry of this order to this District Education Officer, Zila Parishad, Ahemdnagar

22. The management shall follow the directions issued by the Government/ Department form time to time keeping in view of the safety and security of the children and the overall administration of the school.

23. The recognition shall be withdrawn if any contravention of the provisions of the Act, Rule or the conditions of recognition are found and proved.

24. The school management shall have to full responsibility if any court cases arises this regard. The management is not entitled to seek affiliation to other Board without obtaining NOC from the Concerned State Authority.

NOTARY J. G. WALUNJ Area Ahmednagar District Reg. No. 6436 Exp. Dt. 30/7/2023 GOVERNMENT OF INDIA

**Seal & Signature of issuing authority ......................**

**Name & Address of issuing authority ................**

BEFORE ME

J. G. WALUNJ
Notary Govt. of India
Sangamner, Dist. Ahmednagar

THIS DOCUMENT

NOTED & REGISTERED
AT SERIAL NO 2256 /2023

**General Manager**
**Nashik Region**
**Podar Charity Trust**

**Principal**
**Podar International School**
**Sangamner**

जिल्हा परिषद अहमदनगर, शिक्षण विभाग (प्राथमिक)
दुरध्वनी क्रमांक - ०२४१-२३५३६९४
ई मेल आयडी - prathmik55@gmail.com
पत्ता- नविन प्रशासकीय इमारत, अहमदनगर पिन कोड - ४१४००१

नमुना-2

ग्राम:-सुकेवाडी दुरध्वनी:-7428092053 फॅक्स:- मोबाईल:-829120252, 8079488990

युडायस क्रमांक -27261207606 ई-मेल admin.sangamner@odar.org

जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांचे कार्यालय, अहमदनगर,महाराष्ट्र

जावक क्र प्राथ.शिक्षण/ कार्या-4/आर.टी.इ.स्व मा/351/ 2022 दिनांक 14/9/2022

व्यवस्थापक –पोदार चॅरिटी ट्रस्ट,मुंबई,महाराष्ट्र

**विषय:**-बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम,2009 यांच्या कलम 18 च्या प्रयोजनार्थ,बालकांना मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क नियम,2011 याच्या नियम 11,पोट नियम (4) अन्वये शाळांना मान्यता प्रमाणपत्र देण्याबाबत.

**महोदय/महोदया,**

आपल्या दिनांक 06/7/2022 च्या अर्जाच्या संदर्भात आणि त्यांनतर यासंदर्भात शाळेशी केलेला पत्रव्यवहार/शाळेची केलेली तपासणी या आधारे मी, **भास्कर पाटील, शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद अहमदनगर** दिनांक 01/04/2022 पासून दिनांक 31/03/2025 पर्यंत तीन वर्षांच्या कालावधीसाठी इयत्ता 01 ते 08 वी करिता **पोदार इंटरनॅशनल स्कूल,सुकेवाडी**,ता.संगमनेर जि. अहमदनगर या शाळेस तात्पुरती मान्यता देत आहे.

1. मान्यता कालावधी वाढवून मिळणार नाही आणि इ.8 वी नंतर मान्यता किंवा संलग्नता देण्यास कोणत्याही परिस्थितीत कोणतेही बंधन नसेल.
2. बालकांना मोफत सक्तीच्या शिक्षणाचा अधिनियम 2009 (जोडपत्र एक) आणि महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम 2011 (जोडपत्र दोन) मधील तरतुदीचे शाळा पालन करील.
3. शाळा नजिकच्या दुर्बल घटकातील आणि वंचित गटातील बालकांना पहिल्या इ.त्या इयत्तेतील विदयार्थी संख्येच्या किमान 25 टक्के मर्यादेपर्यंत प्रवेश देईल आणि प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत त्यांना मोफत व सक्तीचे शिक्षण देईल परंतु आणखी असे की,पुर्व प्राथमिक इयत्तांच्या बाबतीत देखील या प्रमाणकाचे अनुपालन करण्यात येईल.
4. परिच्छेद 3 मध्ये निर्दिष्ट केलेल्या बालकांकरिता शाळेला अधिनियमाच्या कलम 12 (2) नुसार प्रतिपूर्ती मिळेल अशी प्रतिपूर्ती मिळण्यासाठी शाळेला स्वतंत्र बँक खाते देण्यात येईल.
5. संस्था/शाळा कोणत्याही कॅपिटेशन फी वसुल करणार नाही आणि कोणत्याही छाननी पध्दतीसाठी बालकास किंवा त्यांच्या किंवा तीच्या माता-पित्यास किंवा पालकांस भाग पाडणार नाही.
6. कोणत्याही बालकांस वयाच्या पुराव्याच्या अभावी धर्म,जात किंवा वंश जन्म ठिकाण किंवा यापैकी कोणत्याही कारणास्तव व शाळेमध्ये प्रवेश नाकारण्यात येणार नाही.
7. (एक) शाळेत प्रवेश दिलेल्या कोणत्याही बालकांस तो काणत्याही इयत्तेत असेल त्याच इयत्तेत रोखुन ठेवले जाणार नाही किंवा प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत शाळेतून काढून टाकण्यात येणार नाही.
   (दोन) कोणत्याही बालकांस शारीरिक शिक्षा किंवा मानसिक त्रास देणार नाही.
   (तीन) कोणत्याही बालकांस प्राथमिक शिक्षणपूर्ण होईपर्यंत कोणत्याही मंडळाची परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक असणार नाही.
   (चार) प्राथमिक शिक्षण पूर्ण केलेल्या प्रत्येक बालकास नियम 23 अन्वये निर्धारित केलेले प्रमाणपत्र देण्यात येईल.
   (पाच) विकलांग/विशेष गरजा असलेल्या विदयार्थ्यांचा अधिनियमाच्या तरतुदी नुसार समावेश करण्यात येईल.
   (सहा) अधिनियमाच्या कलम 23 (1) अन्वये निर्धारित केलेली मिान अर्हता धारण करणा-या शिक्षकांना अशी किमान अर्हता 5 वर्षाच्या कालावधीत संपादित करावी लागेल.
   (सात) अधिनियमाच्या कलम 24 (1) मध्ये विनिर्दिष्ट केलेली त्याची/तिची कर्तव्य शिक्षक पार पाडतील.
8. शाळा समुचित प्राधिकरणाने निर्धारित केलेल्या अभ्यासक्रमांच्या आधारे तयार केलेल्या पाठयक्रमाचे पालन करील.
9. शाळा अधिनियमाच्या कलम 19 मध्ये विहित केल्याप्रमाणे शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधाच्या तुलनेत विदयार्थ्यांना प्रवेश देईल.
10. शाळा अधिनियमाच्या कलम 19 मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मानकांचे व प्रमाणकांचे पालन करील.मागील तपासणीच्या वेळेत उपलब्ध असलेल्या सुविधा खालील प्रमाणे होत्या

| | |
|---|---|
| • शाळेच्या परिसराचे क्षेत्रफळ | 6,000 चौ.मी. |
| • एकूण बांधकाम क्षेत्र | 1,700 चौ.मी. |
| • खेळाच्या मैदानाचे क्षेत्रफळ | 4,000 चौ.मी. |
| • वर्गखोल्यांची संख्या | 17 |
| • कार्यालय-नि-भांडार-नि-मुख्याध्यापकांची खोली | 05 |

(कृ.मा.प.)



General Manager
Nashik Region
Podar Charity Trust

Patil.
Principal
Podar International School
Sangamner

Scanned by CamScanner

- मुलांसाठी व मुलींसाठी स्वतंत्र प्रसाधनगृहे-जेथे वापरण्यासाठी व प्रसाधनगृहे स्वच्छ आणि आरोग्यदायी स्थितीत ठेवण्यासाठी पुरेसे पाणी असेल.- **आहे**
- पिण्याच्या पाण्याची सुविधा---- **आहे**
- दुपारचे जेवण शिजविण्यासाठी स्वयंपाकघर----- **लागू नाही**
- अध्यापन अध्ययन साहित्य/खेळ व क्रीडाविषयक सामग्री/ग्रंथालय यांची उपलब्धता------- **आहे.**
- वाचन साहित्य विनायासास उपलब्ध--------- **आहे**

11. मान्यता नसलेले वर्ग किंवा तुकडया शाळेच्या नावाने शाळेच्या परिसरात किंवा इतरत्र चालविता येणार नाहीत.
12. शाळेची इमारत किंवा इतर बांधकाम किंवा क्रिडांगण हे केवळ शिक्षणाच्या व कौशल्य विकासाच्या प्रयोजनार्थ वापरण्यात येतील.
13. शाळा,सोसायटी नोंदणी अधिनियम,1860(1860 चा 21 ) किंवा मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, 1950 अन्वये नोंदणी झालेल्या संस्थामार्फत चालविण्यात येत आहे.
14. शाळा कोणत्याही व्यक्तीच्या गटाच्या किंवा व्यक्तिसंधाच्या किंवा इतर कोणत्याही व्यक्तीच्या फायदयाकरिता किंवा कोणताही नफा मिळविण्यासाठी चालविण्यात येत नाही.
15. शाळेचे लेखे सनदी लेखापालाकडून लेखापरिक्षित व प्रमाणित करुन घ्यावेत आणि नियमांनुसार योग्य लेखा विविरणपत्रे तयार करावीत.प्रत्येक लेखा विविरणपत्राची एक प्रत दरवर्षी जिल्हा शिक्षणाधिकारी कडे पाठवण्यात यावी.

**16.** तुमच्या शाळेला मिळालेला मान्यता संकेतांक-

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 0 | 1 | 8 | 3 | 4 | 0 | 2 | 1 |

**12-018-34-021** असा आहे,हा या कार्यालयाशी कोणताही पत्रव्यवहार करताना कृपया तो नमूद करावा,याची नोंद घ्यावी.

17. शिक्षण संचालक/जिल्हा शिक्षणाधिकारी वेळोवेळी मागणी करतील असे अहवाल व माहिती शाळेने सादर करावी किंवा शाळेच्या मान्यतेच्या शर्तीची निरंतर पूर्तता करण्यासाठी किंवा शाळेच्या कामकाजातील त्रुटी दूर करण्यासाठी शासन किंवा स्थानिक प्राधिकरण देईल अशा सूचनांचे पालन करावे.
18. संस्थेच्या नोंदणीचे कोणतेही दस्तावेज असल्यास नूतनीकरण केल्याची तारीख संनिश्चित करावी.
19. जोडपत्र (तीन) नुसार इतर शर्ती यासोबत जोडल्या आहेत.
20. संस्थेच्या मा.धर्मदाय आयुक्त यांचे कडील नोंदणीबाबत अपुर्तता,पदाधिकारी चेंज रिपोर्ट (बदल अहवालनुतनीकरण,लेखापरिक्षण इत्यादी संदर्भातील प्रकरणे प्रलंबित असल्यास सदर अहवालाची पुर्तता करुन घ्यावी व मा.धर्मदाय आयुक्त यांचेव्दारे मिळालेली परिशिष्ट 1 ची अदयावत प्रत शालेय दप्तरी जतन करुन ठेवावी.
21. संस्थेत वाद असल्यास मा.धर्मदाय आयुक्त,अहमदनगर यांचेव्दारे अंतीम निश्चित केलेल्या परिशिष्ट 1 मधील पदाधिकारी किंवा मा.धर्मदाय आयुक्त यांचेव्दारे सदर संस्थेच्या शाळेवर नमलेल्या प्रशासकास देण्यात येईल.
22. शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या निर्णयांचे,परिपत्रकांचे,आदेशांचे व कार्यपध्दतीचे पालन करणे संस्था व शाळा दोहोंवर बंधनकारक राहील.
23. स्वयंअर्थसहाय्यीत तत्वावरील शाळेस महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियम अधिनियम 2012 (सन 2013 चा 01 ) मधील सर्व तरतुदींचे पालन बंधनकारक राहील.
24. शासनाकडून, **पोदार इंटरनॅशनल स्कूल,** या नावाने **इंग्रजी** माध्यमासाठी **सुकेवाडी,ता.संगमनेर.जि.अहमदनगर** या ठिकाणी शाळा सुरु करण्यास परवानगी देण्यात आलेली आहे. भविष्यात माध्यम व ठिकाण यामध्ये कोणताही बदल करता येणार नाही. संस्थेने अथवा शाळेने त्यात कोणताही बदल केल्यास सदर मान्यता आपोआप रद्द होईल. तसेस या बदल दिनांकापासून सदर शाळा अनाधिकृत समजण्यात येईल.
25. सक्षम अधिका-याकडून सदर शाळेस युडायस क्रमांक प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी संबंधित संस्थेची राहील.तथापि शाळेमध्ये प्रविष्ठ झालेल्या प्रत्येक विदयार्थ्यांची माहिती सरल प्रणालीमध्ये समाविष्ट करणे,अदययावत करणे,आधार लिंकिंग करणे,विहीत मुदतीत व नमुन्यात युडायस प्रपत्र संबंधित अधिका-याकडे सादर करणे, प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र अंतर्गत आवश्यक ती सर्व कार्यवाही करणे इ.बाबतची जबाबदारी शाळेची राहील.

(भास्कर पाटील)
शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद अहमदनगर

Principal
Podar International School
Sangamner

General Manager
Nashik Region
Podar Charity Trust

Scanned by CamScanner

**जिल्हा परिषद अहमदनगर, शिक्षण विभाग (प्राथमिक)**
**दुरध्वनी क्रमांक - ०२४१-२३५३६९४**
**ई मेल आयडी - prathmik55@gmail.com**

**पत्ता- नविन प्रशासकीय इमारत, अहमदनगर पिन कोड - ४१४००१**

प्रथम मान्यता जा.क्र.कार्या-४/स्वयंअर्थ/ ५५८/२०२१ दि. —/१२/२०२१
१६/२/२०२२

प्रति,
अध्यक्ष/सचिव
पोदार चॅरिटी ट्रस्ट, मुंबई

विषय :-महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापन व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापन करणे तसेच विदयमान शाळांचा दर्जावाढ करणेसाठी २०२१-२२ या शैक्षणिक वर्षाकरीता परवानगी देऊन प्रथम मान्यता देणेबाबत.

संदर्भः- १)कक्ष अधिकारी महाराष्ट्र शासन यांचेकडील पत्र क्र संकीर्ण ४७२१/प्र.क्र.१७एस एम – २ दि.१८ जून २०२१
२) इ.मु. काझी सहसचिव महाराष्ट्र शासन यांचेकडील मान्यता पत्र क्र.एसएफएस-१०२१/प्र.क्र. १५१/एस एम-२ दि. ८ ऑक्टो.२०२१
३) इ.मु. काझी सहसचिव महाराष्ट्र शासन यांचेकडील इरादा पत्र क्र.एसएफएस-१०२१/प्र.क्र. १५१/एस एम-२ दि. १५ जून २०२१
४)मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग ,पुणे यांचेकडील पत्र जा. क्र. शिऊसं/प्राथ-२/स्वयंअशाळा/मान्यता/पुवि/१३/२३६०९/१२ दि. १३ सप्टें.२०१३
५) गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती,संगमनेर यांचेकडील तपासणी अहवाल दि.१०/१२/२०२१

वरील विषयान्वये आपणास कळविण्यात येते की, आपल्या संस्थेने महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा स्थापना व विनियमन अधिनियम २०१२ अंतर्गत शैक्षणिक वर्षे २०२१-२०२२ मध्ये शाळेचा प्रथम मान्यतेकरीता प्रस्ताव सादर केला होता त्या प्रस्तावानुसार आपल्या संस्थेस संदर्भ क्रनुसार खालील अटी शर्तीची पुर्तता करणेचे अटीवर सन २०२१-२०२२ या शैक्षणिक वर्षापासून प्रथम मान्यता देण्यात येत आहे.

| शासन यादी अ .क्र | जिल्हा | अर्जदार संस्थेचे नाव | मान्यता मिळालेल्या शाळेचे नांव व पत्ता | माध्यम | शाळेचा प्रकार नवीन शाळा/ दर्जावाढ | मान्यता वर्ग/ इयत्ता | मान्यता वर्ष |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | अहमदनगर | पोदार चॅरिटी ट्रस्ट, मुंबई | पोदार इंटरनॅशनल स्कूल सुकेवाडी,ता. संगमनेर,जि. अहमदनगर | इंग्रजी | नवीन शाळा (राज्यमंडळ) | प्राथमिक (इ.१ ली ते ८ वी) | २०२१-२०२२ |

अटी व शर्ती:-

१) प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळांनी बालकांचा मोफत व सक्तीचा अधिनियम २००९, या अंतर्गत केलेले व केले जाणारे सर्व नियमांची /तरतुदींची पूर्तता करणे आवश्यक आहे. संस्थेने शाळा परवानगीसाठी विहित केलेले माध्यम व शाळेचे ठिकाण इत्यादी मध्ये भविष्यात बदल करता येणार नाही.
पात्र ठरलेल्या संबंधीत शाळेच्या व्यवस्थापनाने अधिनियम २००९,मधील तरतूदींची पूर्तता करुन सन २०२१-२२

**General Manager**
**Nashik Region**
**Podar Charity Trust**

Patil.
**Principal**
**Podar International School**
**Sangamner**

व्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल.

३) ज्या व्यवस्थपनास सन २०२१-२२ मध्ये शाळा स्थापन करण्यासाठी शासन निर्णयाद्वारे पात्र ठरविण्यात शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबी उपलब्ध नसतील तर त्यांना सदर बार्बींची पूर्तता करण्यासाठी या शासन निर्णय दिनांकापासून परवानगी मिळालेपासुन १८ महिन्याच्या आत व्यवस्थापनाने शाळा सुरु न केल्यास सदर परवानगी आपोआप रद्द ठरेल.

४) सी बी एस ई,आय सी एस ई, आय बी , आय जी एस ई व सी आय ई इत्यादी शिक्षण मंडळाच्या अभ्यसक्रमाशी संलग्नित होण्यासाठी इच्छुक व्यवस्थापनास /शैक्षणिक संस्थेस शासनाने पात्र ठरवून परवानगी दिलेल्या संस्थांनी शासन निर्णय दि. २० जून २०१२ मध्ये विहित केलेल्या सर्वंकष धोरणानुसार ना हरकत प्रमाणपत्र मिळविण्यासाठी प्रथम मान्यतेनंतर सदर शासन निर्णयातील अटी व शर्तीची पूर्तता केल्यानंतर शासन मंडळ संलग्नतेसाठी ना हरकत प्रमाणपत्र देईल.

५) दर्जावाढ परवानगी दिलेल्या शाळांना शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशांचे,कार्यपध्दतीचे तसेच महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ मधील सर्व तरतुदींचे पालन करणे बंधनकारक राहील. शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये ज्या वर्गास परवानगी दिलेली आहे त्या वर्गाव्यतिरिक्त इतर वर्ग चालु करता येणार नाहीत

६) परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळा यांना शासनाच्या वेळोवेळी निर्गमीत होणा-या आदेशाचे,कार्यपध्दतीचे तसेच बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ व महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा स्थापना व विनियमन मुख्य अधिनियम २०१३ मधील सर्व तरतुदीचे पालन करणे बंधनकारक राहील.

७) शाळेने अधिनियम २००९ मधील तरतुदीचे पालन करणे बंधनकारक राहील. शाळा इमारतीच्या दर्शनी भागात सर्व जनतेच्या माहितीकरीता स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी पात्र नवीन शाळा/ वर्ग असे दर्शविणारा फलक लावणे बंधनकारक राहील.

८) महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा स्थापना व विनियमन अधिनियम २०१२ या अधिनियमाच्या अंतर्गत मान्यता दिलेल्या शाळेचे भविष्यात अन्य ठिकाणी स्थलांतर करता येणार नाही.

९) यु डायस डाटा - शासन निर्णयाद्वारे महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा स्थापना व विनियमन अधिनियम २०१२ या अधिनियमाच्या अंतर्गत परवानगी दिलेल्या शाळांना माहिती भरताना स्वयंअर्थसहाय्यित शाळा/ वर्ग म्हणुन स्वतंत्र नोंद करणे संबंधीत संस्थेवर आवश्यक राहील. याबाबतची पुढील कार्यवाही करण्यायाठी राज्य प्रकल्प संचालक महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद,मुंबई यांना नोडल अधिकारी घोषित करण्यात येत आहे.

१०) महाराष्ट्र शासन बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम २०११ च्या पोटनियम (४) नुसार ११ मानके पुर्ण करणे आवश्यक आहे.

११) शासनाचे सध्या अस्थित्वात असलेले प्रचलित नियम व शासन वेळोवेळी विहित करेल अशा नियमाची अंमलबजावणी करणे संस्थेला बंधनकारक राहील.

१२) शासन निर्णय दिनांक १३ डिसें २०१३ व २८/८/२०१५ नुसार संच निश्चिती करुन घेणे आवश्यक आहे.

१३) प्रचलित नियम व निकषानुसार शिक्षक नियुक्ती करावी / टीईटी पात्र शिक्षकांची नियुक्तीसाठी योग्य ती कार्यवाही करावी

१४) संस्था व्यस्थापन व शिक्षणाधिकारी प्राथ.,जि.प. अहमदनगर यांचे संयुक्त नावे राष्ट्रीयीकृत बँकेत तीन वर्षे कालावधीसाठी मुदतठेव ठेवणे आवश्यक आहे.

(भास्कर पाटील)
शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद अहमदनगर

प्रत- माहिती स्तव -

१)मा.शिक्षण उपसंचालक ,पुणे विभाग, पुणे-१
२)मा.शिक्षण संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनाय,महाराष्ट्र राज्य, पुणे-१
३)मा.शिक्षण संचालक,प्राथमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-१
४)गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती, संगमनेर

General Manager
Nashik Region
Podar Charity Trust

Patil.
Principal
Podar International School
Sangamner